स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयाच्या

विद्यावाचस्पती (पीएच. डी .) पदवी साठी सादर करावयाच्या

शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

शीर्षक

यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रीय राजकारणातील योगदान: एक अभ्यास

(विशेष संदर्भ : ई. स. १९६२ ते १९७७ चा कालखंड)

संशोधक

नामदेव दिगांबर सुर्यवंशी

(एम. ए. बी. एड.)

मार्गदशक

साहाय्यक प्राध्यापक

प्रा. डॉ. पी. जी. जाधव

(एम. ए. नेट. पीएच. डी.)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद.

❖ प्रस्तावना :-

भारताने संसदीय लोकशाही पद्धतीचा स्विकार केलेला आहे. भारतात अनेक प्रांत, भाषा व वेगवेगळया समाजाचे लोक आहेत,त्यामुळे विविधतेतून एकता साधण्यासाठी लोकशाही व धर्मनिरपेक्षता या तत्वांचा स्वीकार घटनाकारांनी केला आहे. संसदीय लोकशाहीत राष्ट्रप्रमुख हा अप्रत्यक्ष लोकांकडून निवडून दिला जातो, त्यामुळे सत्ता ही लोकांच्याचहातात असते असे मानले जाते. संसदीय लोकशाहीत कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ असे वेगवेगळे घटक पाहावयास मिळतात.पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्रभारताचे प्रथम प्रधान मंत्री होते. त्यांनी संसदीय लोकशाही यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. अलिप्ततावाद, धर्मनिरपेक्षता, समानता अशा घटकांना त्यांनी मानाचे स्थान दिले. त्यामुळे ते एक व्यापक राजकारणी होते. समाजवादी लोकशाहीचा पुरस्कार पंडित नेहरू यांनी केला. पंडित जवाहरलाल नेहरूंचा मोठ्या प्रमाणात प्रभाव यशवंतराव चव्हाण यांच्यावरती पडलेला दिसून येतो. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पावलावर पाऊल ठेऊन पुढे जे काही राष्ट्रीय राजकारण केले ते खूप महत्वपूर्ण अशा स्वरूपाचे होते.

स्वातंत्र्यानंतरच्या महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकारणावर ज्यांनी ज्यांनी प्रभाव पाडला त्यापैकी एक व्यक्ती म्हणजे "यशवंतराव चव्हाण " हे होत. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्रातून देश पातळीवरील एक राष्ट्रीय नेतृत्व होते. ते पंडित जवाहरलाल नेहरूंचे अनुयायी होते, ते महाराष्ट्राच्या अगोदर देशाचा विचार करणारे नेते होते. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी देवराष्ट्र या गावी झाला. यशवंतराव अवघ्या ४ वर्षांचे असताना त्यांचे वडील १९१७ ला मरण पावले. त्यामुळे त्यांचा सांभाळ त्यांच्या आईने केला. यशवंतराव यांनी प्राथमिक शिक्षण देवराष्ट्र व कराड येथे घेतले होते. शालेय जीवनातच ते कार्यकर्ता म्हणून कार्येरत होते. कार्यकर्ता ते नेता नव्हे लोकनेता असा त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवनाचा प्रवास होता. विधार्थी अवस्थेपासून यशवंतराव यांच्यात समर्पित भाव दिसून येतो. आई विठाबाई बद्दल नितांत प्रेम होते. ते आईला सर्वस्वी मानत असत. त्यांच्यावर खूपच चांगले संस्कार त्यांच्या आई ने केले होते. यशवंतरावांच्या आई शिकलेल्या नव्हत्या पण सुसंस्कृत होत्या. त्यांनी योग्य ते संस्कार यशवंतरावांवर केले होते.

यशवंतराव चव्हाण हे ई.स.१९६२ ला संरक्षण मंत्री म्हणून महाराष्ट्रातून राष्ट्रीय स्तरावर गेले व तेथूनच त्यांच्या राष्ट्रीय राजकारणाला सुरुवात झाली. यशवंतराव चव्हाण यांनी गृहमंत्री असतांना १९६७ मध्ये खूप महत्वपूर्ण अशा स्वरूपाचे कार्ये केलेले दिसते.ते गृहमंत्री असतांना महाराष्ट्रराज्ये व केंद्रसरकार यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात

तणावाचे वातावरण असताना देखील यांनी खूप संयमाने कार्य केले. इ. स. १९६९-७० मध्ये काँग्रेस मध्ये अंतर्गत फूट पडलेली असताना देखील त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे आपले राष्ट्रीय कार्य पार पाडले. तसेच बँकांचे राष्ट्रीयकरण हि याच काळाच्या सुमारास झाले, तेव्हा त्यांनी अर्थमंत्री म्हणून महत्वाचे कार्य केले. १९७१ ला भारत-बांग्लादेश युद्ध झाले तेव्हा मोठ्या प्रमाणात ताण तणाव होता. अशा परिस्थितीत त्यांनी देश्याच्या अर्थमंत्र्यांची जी जबाबदारी पार पाडली ती खूप महत्वपूर्ण अशा स्वरूपाची होती. इ.स. १९७५ इंदिरा गांधी पंतप्रधान असताना आणीबाणी लागू करण्यात आली होती, तेव्हा यशवंतराव चव्हाण हे देशाचे परराष्ट्रमंत्री होते तेव्हा त्यांनी जागतिक पातळीवर भारतीय लोकशाही पोहचवीली आणि इत्तर देशाबरोबर शांततेचे व सहकार्याचे धोरण त्यांनी स्वीकारले.

❖ संशोधन विषयाची निवड :-

यशवंतराव चव्हाण यांची राष्ट्रीय राजकारणातील वेगवेगळी भूमिका कशी होती याचा सखोल अभ्यास करण्या साठी हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे. यशवंतराव चव्हाण गृहमंत्री असतांना चे त्यांचे कार्ये आणि संरक्षण मंत्री असतांना चे कार्य व अर्थमंत्री असतांनाचे त्यांचे कार्य अशा सर्व पदावरील त्यांच्या कार्याचा अभ्यास करण्या साठी या संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास हा खुप मोठ्या प्रमाणात झालेला आहे, पण राष्ट्रीय स्तरावरील त्यांचे कार्य याचा अभ्यास पाहिजे त्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही त्यामुळे हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आलेला आहे. त्यांचे राष्ट्रीय स्तरावरील राजकारण समजुन घेण्यासाठी हा विषय निवडण्यात आलेला आहे. यशवंतराव चव्हाण यांच्यावरती खुप लिखाण कार्य झालेले आहे पण त्यात त्यांच्या राष्ट्रीय कार्याचा उल्लेख फार कमी झालेला दिसुन येतो.

संशोधन क्षेत्र व संशोधनाचा कालखंड :-

यशवंतराव चव्हाण यांच्या राष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करणे हे या संशोधन विषया हेतू असेल. या मध्ये त्यांनी केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील सर्व कार्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यांनी जे काही राजकीय कार्य केले त्या सर्व कार्याचा सखोल अभ्यास करणे असे या संशोधन अभ्यासाचे व्यापक उद्दिष्ट असेल. यशवंतराव चव्हाण यांचे कार्य क्षेत्र हे ई. स. १९६२ ते १९७७ या कालखंडातील आसल्यामुळे या कालखंडातील यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा अभ्यास या संशोधनात करण्यात येणार आहे .

❖ पूर्वसंशोधनाचा आढावा :-

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय व सामाजिक कार्यवरती खूप मोठ्या प्रमाणात संशोधन झालेले दिसून येते. तसेच वेगवेगळया लेखकांनी पुस्तके ही लिहिलेली आहेत. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होते,त्यामुळे त्यांच्या महाराष्ट्राच्या राजकारणावर खूप मोठे संशोधन झालेले दिसून येते.

या संशोधनासाठी खालील संशोधन साहित्याचा पूर्व आढावा घेण्यात आलेला आहे.

१) गोविंद तळवलकर :- "यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व" या पुस्तकात त्यांचे सर्व राजकीय, सामाजिक, साहित्तीक कार्य याचा अभ्यास केलेला आहे.

२) उल्हास एकनाथ उढाण :- "यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण" या संशोधनात यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात काय भूमिका बजावली यांचा अभ्यास केलेला आहे.

३) भारत तुकाराम मोरे :- "यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय व सामाजिक विचार या संशोधनात त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्यांचा सखोल अशा स्वरूपाचा अभ्यास केलेला आहे.

४) प्रा. उर्मिला नरशिंग क्षीरसागर :- "महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे योगदान : ऐतिहासीक अभ्यास" या संशोधनात यशवंतराव मुख्यमंत्री आसतांनाचे त्यांचे राजकीय कार्य कसे होते याचा अभ्यास प्रा. उर्मिला रशिंग क्षीरसागर यांनी केलेला आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्या राष्ट्रीय कार्यावरती जास्त संशोधन झालेले दिसत नाही त्यामुळे हा विषय येथे संशोधना साठी निवडला आहे.

❖ संशोधनाचे महत्व :-

यशवंतराव हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होते. त्यांनी महाराष्ट्रातून राजकारणाला सुरुवात केली आणि पुढे ते राष्ट्रीय राजकारणात गेलेत. देशाच्या विकासात त्यांची काय भूमिका होती हे अभ्यासण्यासाठी त्यांच्या कार्यांचा अभ्यास करणे हे खुप महत्वाचे आहे त्या मुळे त्यांचे राजकीय राजकारणातील कार्य कसे होते हे समजण्यास मदत होते. आज च्या राजकीय परिस्थितीत कसे राजकारण करावे आणि समाजाचा विकास कसा साधावा या साठी यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रीय राजकारणातील कार्य हे खुप महत्वपूर्ण अशा स्वरूपाचे आहे. त्यांनी पार पाडलेल्या राजकारणातील सर्व भूमिका ह्या खूप महत्वपूर्ण अशा स्वरूपाच्या होत्या. त्यांचे कार्य हे खूप व्यापक असे होते,त्या मुले त्यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

❖ संशोधनाची उद्दिष्टे :-

१) यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन व कार्याचा अभ्यास करणे.

२) यशवंतराव चव्हाण यांच्या राष्ट्रीय राजकारणातील योगदानाचा अभ्यास करणे.

३) यशवंतराव चव्हाण यांचा परराष्ट्रविषयक धोरणांचा अभ्यास करणे.

४) यशवंतराव चव्हाण यांचा संरक्षणविषयक कार्यांचा अभ्यास करणे.

५) यशवंतराव चव्हाण यांच्या अर्थविषयक धोरणांचा अभ्यास करणे.

❖ संशोधनाची गृहितके :-

१) यशवंतराव चव्हाण हे सुसंस्कृत व जाणते राजकारणी होते.

२) यशवंराव चव्हाण यांनी राष्ट्रीय राजकारणात खूप महत्वपूर्ण अशा स्वरूपाचे योगदान दिलेले आहे.

३) यशवंतराव चव्हाण यांनी परराष्ट्र धोरणात महत्त्वाचे कार्य केले .

४) यशवंतराव चव्हाण यांनी भारतीय संरक्षण खात्यात सुधारणा घडवून आणली.

५) यशवंतराव चव्हाण यांची राजकीय कारकिर्द व त्यातील निर्णय आणि धोरणे हे नेहरूवादी धोरणांचाच राज्यस्तरीय अविष्कार होता.

❖ संशोधन पद्धती :-

या संशोधनात समाजशास्त्रीय संशोधन पद्धती चा वापर करण्यात येणार आहे आणि वर्णनात्मक संशोधन अशा मिश्र स्वरूपाच्या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. या संशोधनात ग्रंथालय या पद्धती द्वारे प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही स्रोतांचा वापर करण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र आणि इतर लेखकांनी लिहिलेली पुस्तके तसेच राजकीय कागदपत्रे यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे त्या मुळे प्राथमिक आणि दुय्यम अशा या साधानद्वारे माहिती मिळविली जाणार आहे.

❖ संशोधन आराखडा :-

१) प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात समस्यासूत्रन, विषय निवडीचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, संशोधन पद्धती, संशोधनाचे स्रोत आणि पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

२) प्रकरण दुसरे : यशवंतराव चव्हाण यांची जडण घडण

प्रस्तुत प्रकरणात यशवंतराव चव्हाण यांचे बालपण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, त्यांच्या आईने त्यांच्यावरती केलेले संस्कार, यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण यांची राजकीय जडण घडण महाविद्यालयात असतांनाच झाली आहे याचा ही अभ्यास यात करण्यात येणार आहे.

३) प्रकरण तिसरे : राजकीय नेतृत्वाची बांधणी

प्रस्तुत प्रकरणात यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय नेतृत्व कसे घडत गेले यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार असुन त्यांनी राजकीय नेतृत्व कसे केले याचा सविस्तर विचार या प्रकरणात करण्यात येणार आहे.

४) प्रकरण चौथे : यशवंतराव चव्हाण यांची राष्ट्रीय राजकारणातील भूमिका

प्रस्तुत प्रकरणात यशवंतराव चव्हाण यांची राष्ट्रीय राजकारणातील महत्वाची भूमिका कोणती होती, त्यांनी कोणकोणत्या महत्वाच्या पदावरती कार्य केले याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे. ते संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री व उपपंतप्रधान होते. या सर्व पदावरील त्यांचे कार्य कसे होते याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

५) प्रकरण पाचवे : निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाअंती जे काही निष्कर्ष आणि शिफारशी निघाल्यात त्या विषयी या प्रकरणात अभ्यास करण्यात येणार आहे. एकंदरीत सर्व प्रकरणाचा सार या प्रकरणात आलेला असतो. यशवंतराव यांचे राष्ट्रीय राजकारण कशा स्वरूपाचे होते, त्यांनी राष्ट्रहितासाठी कसे कार्य केले याचा उहापोह येथे करण्यात आलेला असतो.

❖ संदर्भ सूची :-

१) आगलावे प्रदिप : " सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे ", साईनाथ प्रकाशन, नागपूर. २०१०

२) केळकर भा. कृ. : " यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व ", महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. १९८५

३) खांडेकर राम : " सत्तेच्या पडछायेत ", राजहंश प्रकाशन, पुणे. २०१९

४) गुहा रामचंद्र : "आधुनिक भारताचे विचारस्तंभ ", रोहन प्रकाशन, पुणे. २०१८

५) गुहा रामचंद्र : "आधुनिक भारताचे विचारस्तंभ ", रोहन प्रकाशन, पुणे. २०१८

६) चव्हाण यशवंतराव : " कृष्णाकाठ ", प्रेस्टिज प्रकाशन, पुणे. १९८४

७) चव्हाण यशवंतराव : " ऋणानुबंध ", प्रेस्टिज प्रकाशन, पुणे. १९७९

८) चव्हाण यशवंतराव : " सह्याद्रिचेवारे ", रोहन प्रकाशन, पुणे. १९६२

९) चव्हाण यशवंतराव : " युगांतर ", कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे. १९७०

१०) चव्हाण यशवंतराव : " भूमिका ",प्रेस्टिज प्रकाशन,पुणे.१९७९

११) चंद्र बिपन : " इंडिया सिन्स इंडिपेंडन्स ", के. सागर प्रकाशन, पुणे. २००४

१२) चंद्र बिपन : " समकालीन भारत ", अनामिका पब्लिशर्स, नवी दिल्ल्ली. २०१५

१३) जोशी रामभाऊ : " यशवंतराव एक इतिहास ", प्रतिभास प्रकाशन, परभणी.

१४) जोशी रामभाऊ : " विदेश दर्शन ", सुरेश एजनसी, वाई. १९८८

१५) नाईकवाडे अशोक : " महाराष्ट्राचे भाग्यविधाते ", विद्याभारती प्रकाशन, लातूर. २०१२

१६) पळशीकर सुहास व डॉ. बिरमल नितीन : " महाराष्ट्राचे राजकारण ", प्रतिमा प्रकाशन पुणे. २००९

१७) पाटील आनंद : " सह्याद्री ", साकेत प्रकाशन, औरंगाबाद. २००८

१८) प्रधान राम : " पहिली फेरी ", मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे. २००८

१९) प्रधान राम : " बंधनाचे ऋण ", अमेय प्रकाशन, पुणे. २००१

२०) बाबर सरोजिनी : " मी पाहिलेले यशवंतराव ", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. १९८८

२१) भोळे भास्कर लक्ष्मण : " बदलता महाराष्ट्र ", आंबेडकर अकादमी, सातारा. २००३

२२) भोळे भास्कर लक्ष्मण : " यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. १९८५

२३) मेहंदळे विश्वास : " यशवंतराव ते विलासराव ", अनुबंध प्रकाशन, पुणे. २००७

२४) महानोर ना. धो. : " यशवंतराव चव्हाण ", साकेत प्रकाशन, औरंगाबाद. १९९१

२५) लेले जयंत : " भारत समाज आणि राजकारण ", रोहन प्रकाशन, पुणे. २०२०

संशोधक

सुर्यवंशी नामदेव दिगांबर
(एम.ए.बी.एड.)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पी. जी. जाधव
(एम. ए. नेट. पीएच. डी.)
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद.